दै. देशोन्नती दि. 11/05/23

# टेम्पोमधुन जाणारा ६ लाख ४५ हजार रुपयांचा गुटखा जप्त, दोघेजण ताब्यात

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ विष्णुपूरी पश्चिमेस नवीन बांधकाम झालेल्या पुलाजवळ एका टेम्पोमधून लोहाकडे घेऊन जात असलेला ६ लाख ४५ हजार ८०० रुपये किंमतीचा गुटखा नांदेड ग्रामीण पोलिसांनी ९ मे रोजी जप्त केला असून अन्न व औषधी प्रशासन विभागाच्या तक्रारीवरून दोघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

विष्णुपूरी येथील शासकीय रुग्णालयाच्या कमानीसमोर पुलाचे बांधकाम सुरू असून या मार्गावरून टेम्पो क्रमांक एम.एच.२६-ए.डी.८५४४ मधून लोहाकडे गुटखा घेऊन जात असल्याची माहिती ११२ वरून पोहेकॉ. सुनिल गटलेवार, पोहेकॉ. माधव गिते यांना मिळाली. या माहितीवरून त्यांनी सदर टेम्पो अडवून चौकशी करण्याचा प्रयत्न केला असता उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत होती. त्यामुळे संशय आल्याने वाहन थांबवून पोउपनि राजेश डाकेवाड यांना माहिती दिल्यानंतर पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. यावेळी वाहनाची पाहणी केली असता वाहनचालक माधव पांचाळ व प्रविण श्रीनिवार यांची चौकशी करण्यात आली. टेम्पोची पाहणी केली असता त्यामध्ये राजनिवास पानमसाला, गोल्ड गुटखा, गोवा, मुसाफिर पानमसाला, सुगंधी तंबाखू, आरएमडी पानमसाला अशा विविध कंपन्यांचा गुटख्याचा साठा आढळून आला असून पोलिसांनी टेम्पोसह ६ लाख ४५ हजार ८०० रुपये किंमतीचा गुटखा जप्त केला. याप्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी उमेश कावळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणाचा पुढील तपास पो.नि. अशोक घोरबांड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि. डाकेवाड हे करीत आहेत.

